# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**

phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com

## प्रेसनोट क्र.५७८ दिनांक १०/०७/२०२०

## विरार पोलीस ठाणे यांचेकडुन हातभट्टीची दारू बनविण्यासाठी लागणारा काळा गुळ व नवसागर वाहतुक करणा-या आरोपीतांवर कारवाई करुन एकुण ०५,७६,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त

दिनांक ०९/०७/२०२० रोजी १५.३० वाजताचे सुमारास विरार पोलीस ठाणे हद्दीतील पारोळ फाटा पोस्ट पारोळ ता. वसई जि.पालघर.येथे रोडवर आरोपीत दिनेश झगल दास वय २५ वर्षे रा. विकास अर्पा ए.विंग ६०४, रामबाग एच.डी.एफ.सी. बँकेसमोर कल्याण जि.ठाणे. याने महींद्रा कंपनीची सफेद रंगाची एम.एच. ४७ ए.एस.०१६६ पिकअप मध्ये प्रोव्हीशन गुन्हयाचा गावठी हातभट्टीची दारु बनविण्यासाठी लागणारा काळा गुळ व नवसागर आपले ताबे कब्जात बाळगुन वाहतूक करीत असतांना मिळुन आला. आरोपीत याचे ताब्यातुन १)७५,०००/- रुपये किमतीच्या २५ काळयागुळाच्या गोण्या एका गोणी मध्ये ५० किलो गुळ प्रत्येकी ६०/- रुपये किलो वजनाचा कि.सु. २) १०००/- रूपये किमतीचा नवसागर च्या ५० वडया प्रत्येकी २० रुपये किमतीची कि.सू. ३)५,००,०००/- रुपये किमतीची महिंद्रा कंपनीची सफेद रंगाची एम.एच. ४७ ए.एस.०१६६ पिकअप असा एकुण ५,७६,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीत यांचे विरुध्द विरार पोलीस ठाणे गु.र.नं. III ६४०/२०२० मुंबई दारुबंधी अधीनियम कलम ६५ (फ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास विरार पोलीस ठाणे करित आहेत.

सदरची कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सुरेश वराडे, विरार पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली विरार पोलीस ठाणेचे अधिकारी व कर्मचारी यांनी केली आहे.